साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
स्पेशल आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १२.०५.२०२६ | अंक नं. ०३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# गॅस सिलेंडरसाठी नगरमध्ये रांगा; नागरिक त्रस्त

नगर - मागील २ महिन्यांपासून अजूनही गॅस सिलेंडरसाठी रांगा सुरुच आहेत. सर्वत्र गॅस पुरवठा सुरळीत झालेला असताना शहरातील ग्राहक भांडारसमोर मात्र नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. तर सध्या मागणीच्या तुलनेत पुरवठा निम्माच होत असल्यामुळे नागरिकांना रांगा लावण्याची वेळ येते, असे ग्राहक भांडारकडून सांगण्यात आले.

इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅसची टंचाई निर्माण झाली होती. मात्र, सध्या घरगुती गॅस सिलेंडरचा कोठेही तुटवडा जाणवत नसून, गॅस पुरवठा सुरळीत झाला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत कोठेही गॅससाठी रांगा दिसून येत नाहीत. सर्वत्र घरपोहोच सिलेंडर दिला जातो. मात्र, शहरातील ग्राहक भंडारसमोरच रांगा लागत असल्याचे चित्र दिसून येते.


भर उन्हात घरगुती गॅस साठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा मंगळवार बाजार ग्राहक भांडार येथील हे चित्र. (छाया - धनेश कटारिया)

याबाबत ग्राहक भांडारच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ११ मे रोजी आम्हाला एक गाडी आली होती. गाडी आली की आम्ही लगेच वाटप करुन टाकतो. १२ मे रोजी आम्हाला सिलेंडरची गाडी आली नाही. त्यामुळे वाटप नव्हते. ज्या दिवशी गाडी येते, त्या दिवशी वाटप करतो. त्यामुळे ज्यांना एक सिलेंडर आहे, असे लोकं रांगेत लागतात. तर ज्यांच्याकडे दोन सिलेंडर आहेत, ते देखील पहिले सिलेंडर संपले की लगेच ते भरुन घेण्यासाठी रांगेत लागतात. त्यामुळे ज्यांना खरी गरज आहेत, त्यांच्यावर अन्याय होतो. आमच्याकडे गॅस सिलेंडर घरपोहोच देण्याची व्यवस्था आहे. पण लोकं कार्यालयात गर्दी करतात. त्यामुळे येथे रांग लागते. लोकांनी बुकींग करुन ठेवल्यास त्यांना घरपोहोच सिलेंडर दिला जाईल. मात्र, लोकं घरपोहोच येण्याची वाट न पाहता थेट कार्यालयातच येतात. त्यामुळे मोठी रांग लागते, असे एजन्सीकडून सांगण्यात आले.

दरम्यान सकाळी ७ वाजल्यापासून रांगेत राहून दुपारी १ वाजता गॅस सिलेंडर मिळाला. सध्याच्या प्रचंड कडाक्याच्या उन्हात गॅससाठी रांगेत उभे रहावे लागते. घरपोहोच सिलेंडर मिळाला तर आम्हाला येथे येवून रांगेत उभे रहावे लागणार नाही. ग्राहक भांडारमध्ये नेहमीच गॅस सिलेंडरसाठी रांगा लागतात. त्यामुळे वयोवृद्ध नागरिकांचे मोठे हाल होतात, असे एका नागरिकाने सांगितले.

# तरुणाचे अपहरण करून बेदम मारहाण करत लुटले

नगर - सावेडी उपनगरातील सावता खानावळीसमोरून एका तरुणाचे अपहरण करून त्याला लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. नोकरीवरून काढल्याचा राग मनात धरून ऋषिकेश रमेश गायकवाड आणि त्याच्या साथीदारांनी हे कृत्य केले. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोशन हरीराम तिडके (वय ३६, रा. गोंदिया) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे सावेडी भागात जेवण करत असताना, आरोपी ऋषिकेश गायकवाड याने त्यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नेले. चंदुकाका सराफ दुकानाच्या पाठीमागील निर्जन रस्त्याने एका ढाब्याजवळ नेऊन आरोपींनी त्यांना घेरले. तुला कंपनीने कामावरून का काढले? असा जाब विचारत आरोपींनी लोखंडी रॉड आणि धारदार शस्त्राने रोशन यांच्या डोक्यावर, पायावर आणि पाठीवर गंभीर वार केले व रोशन यांच्या खिशातील कंपनीचे ८ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. जर पुन्हा या भागात दिसला किंवा पोलिसांत तक्रार केली, तर तुझा मुडदा पाडू, अशी धमकी देऊन आरोपी पसार झाले. जखमी रोशन यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोनि. जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करत आहेत.

# दुचाकीसह महागड्या मोबाईलची चोरी

नगर - केडगाव सोनेवाडी रोडवर असलेल्या गुरुकुल शाळेच्या गेट समोर लावलेली एका तरुणाची दुचाकी आणि मोबाईल चोरट्याने पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अथर्व विजय सपकाळ (वय २३, रा. भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अथर्व सपकाळ यांनी त्यांची काळ्या रंगाची हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र.एम.एच. १६ डी.ई. ६१५६) सोनेवाडी रस्त्यावरील गुरुकुल शाळेच्या गेटसमोर उभी केली होती. ९ मे च्या रात्री ते १० मे च्या सकाळच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने ४० हजार रुपये किमतीची ही दुचाकी आणि २० हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या प्रकरणी फिर्यादीने ११ मे रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोनि. संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राहुल शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नीट परीक्षा रद्द; सीबीआय करणार पेपरफुटीचा तपास

नवी दिल्ली - देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरवणारी नीट-२०२६ परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द करण्याचा निर्णय नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) घेतला आहे. या पेपरफुटीचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला आहे.

एनटीएकडून ३ मे रोजी देशभरातील विविध केंद्रांवर नीट परीक्षा पार पडली होती. नीट परीक्षेसाठी देशभरातून २२ लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते. मात्र, परीक्षा सुरु झाल्यापासूनच पेपर फुटल्याचे अनेक दावे केले जात होते. सुरुवातीला टाळाटाळ करणाऱ्या प्रशासनाने अखेर पेपरफुटीची गंभीर दखल घेतली. प्राथमिक तपासात पेपर फुटल्याचे स्पष्ट होताच, केंद्र सरकारच्या परवानगीने एनटीएने ही परीक्षा अधिकृतपणे रद्द करण्याची घोषणा केली आहे. आता एनटीकडून लवकरच फेरपरीक्षेचे नवीन वेळापत्रक आणि तारखा जाहीर करणार आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावरील सूचनांकडे लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान गेस पेपरच्या माध्यमातून पेपरलीक आणि मोठ्या प्रमाणावर प्रश्न व्हायरल झाले होते. या प्रकरणी राजस्थानमधून एका संशयिताचे नाव समोर आले आहे. ४१० प्रश्न विद्यार्थ्यांना मिळाले होते. त्यापैकी जवळपास १२० प्रश्न हे परीक्षेत विचारण्यात आले होते. या प्रकरणी आतापर्यंत १५ जणांना ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणी आतापर्यंत एफआयआर दाखल करण्यात आलेली नाही. मात्र एसओजीकडून तपास सुरु करण्यात आहे. जयपूरमधून मनीष आणि सीकरमचा राकेश प्रमुख संशियत आहेत. पेपरफुटीचे नेटवर्क इतर राज्यात पसरल्याचा संशयही तपास यंत्रणांना आहे.

पाहिजेत
कुक : लेडीज/जेन्टस
भाकरी व पोळ्या लाटण्यासाठी महिला - २
कृष्णेश्वर पार्सल पॉईंट
9270703637
नवीन शाखा क्र.२,क्राऊन प्लाझा कोटक महिंद्रा बँकेसमोर, पाईपलाईनरोड,अ.नगर

आपकी मधुर स्मृति, स्नेह, आदर्श, मार्गदर्शन, आशिर्वाद हमारे लिए सदैव प्रेरणादायक रहेंगे..
स्मृतिगंध
स्व. नेमीचंदजी मुनोत
(नेवासकर)
।। आपल्या पावन स्मृतिस विनम्र आदरांजली ।।
केशरगुलाब मुनोत परिवार
(नेवासकर)
आडत बाजार, अहिल्यानगर

मरणोत्तर नेत्रदानाची वाट, अंध जीवनाची चैतन्यमय पहाट...
"मरणोत्तर नेत्रदान करुया, दोन अंधाचे अंध:कारमय जीवन प्रकाशमान करुया.."
स्व.श्री. जयपालदास चांडूमल दुसेजा
दुसेजा परिवाराच्या योगदानाबद्दल शतशः ऋणी आहोत.
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिकचौक, अहिल्यानगर 414001
संपर्क मोबा.: 8888982222 / 9112288611

महात्मा फुले जन आरोग्य योजना
सर्व रंगाच्या शिधापत्रिका धारकांना मिळणार योजनेचा लाभ
MJPJAY
फक्त लहान मुलांसाठी मोफत आंतररुग्ण सेवा
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटी शेजारी,अ.नगर येथे उपलब्ध आहे.
त्यासाठी लागणारे कागदपत्रे :
१) रेशन कार्ड सर्व रंगांचे २) आयुष्यमान कार्ड कुटुंबातील व्यक्तिचे ३) आधारकार्ड रुग्णाचे.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
मो : 9511110444,9881800444
डॉ.अनिरुध्द गिते (MBBS, MD paeds)

2BHK चा 1 फ्लॅट विकणे आहे
सारस नगर येथे नवीन पुलाच्या शेजारी 12 मीटर मुख्य रस्त्याच्या फ्रंट साईडला गणराज टॉवर्स मध्ये रेडी पजेशन
Mo. 8275200054 / 9850497767

पाचवे पुण्यस्मरण
चंदनापरी देह झिजविला
कष्टातुन वसंत फुलविला,
उरली नाही साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला,
आजही तुमची वाट पाहतो,
यावे पुन्हा जन्माला..
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली..
स्व. किसन (मामा) रामभाऊ दंडवते
स्व. दि. १२/०५/२०२२
* शोकाकुल *
समस्त दंडवते, गलांडे, बारस्कर, जपे परिवार
फर्म : रोहिदास दंडवते केबल नेटवर्क
सावेडीगांव, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## नगरमध्ये डॉक्टरला रस्त्यात अडवून गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून पळविली

नगर - शहर परिसरात चोरीच्या घटनांचे सत्र सुरूच असून, प्रेमदान हडको परिसरात दोन अनोळखी चोरट्यांनी एका डॉक्टरला रस्त्यात अडवून त्यांच्या गळ्यातील २ तोळ्याची सोन्याची चेन हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत डॉ. उमेशचंद्र जनार्दन मोरे (वय ४९, रा. पाईपलाईन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे रात्रीच्या वेळी पाईपलाईन रोड परिसरातील अरिहंत बॉडी सपोर्ट सर्जिकल या दुकानात जात होते. ते प्रेमदान हाडको येथील महादेव मंदिराजवळ आले असता, दोन अनोळखी इसम अचानक त्यांच्या समोर आले. या चोरट्यांनी काही कळण्याच्या आतच मोरे यांच्या गळ्यातील साठ हजार रुपये किमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने हिसकावून घेतली.

चोरी केल्यानंतर दोन्ही आरोपींनी घटनास्थळावरून त्वरित पळ काढला. फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीनंतर तोफखाना पोलिसांनी अनोळखी चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०४ प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.दिलीप टिपरसे यांनी परिसराची पाहणी केली.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत असून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु केली आहे.

## लुटमार करणारी सराईत गुन्हेगारांची टोळी पकडली

### आरोपींकडून १० गुन्हे उघडकीस, ११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



नगर - अहिल्यानगर-सोलापूर रोडवरील वाकोडी गावाच्या शिवारात जुना जकात नाका येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सराईत चोरट्यांची टोळी पकडली असून, आरोपींकडून विविध ठिकाणचे १० गुन्हे उघडकीस आले असून, ११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गणेश दिवानजी काळे (वय-२८, रा. वाकोडी, ता. जि. अहिल्यानगर), विनय उर्फ टकल्या योगेश काळे (वय-१९, रा. वाळुंज, ता.जि. अहिल्यानगर), रोहित लल्या भोसले (वय-२३, रा. सराटी वडगाव, ता. आष्टी, जि. बीड) अशी आरोपींची नावे आहेत.

२१ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत ताराबाई मुरलीधर कोकाटे या शेतात काम करत असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ७८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने बळजबरीने ओरबाडून नेले होते. या गुन्ह्याचा तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिष भोये, महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, फुरकान शेख, श्यामसुंदर जाधव, बाळासाहेब खेडकर, भाऊसाहेब काळे, किशोर शिरसाठ, मनोज साखरे, सुनिल मालणकर, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डिले, महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री भिटे, किरण ठुबे, चालक भगवान धुळे, अरुण मोरे यांचे एक विशेष पथक तयार करण्यात आले होते. तांत्रिक कौशल्य आणि खबऱ्यांच्या माहितीनुसार, हा गुन्हा रेकॉर्डवरील गुन्हेगार गणेश दिवानजी काळे याने केल्याचे निष्पन्न झाले. तो आपल्या साथीदारांसह अहिल्यानगर-सोलापूर रोडवर वाकोडी शिवारात येणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तिथे सापळा रचला. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पथकाने पाठलाग करून तिघांना ताब्यात घेतले. यातील आरोपी गणेस दिवानजी काळे याच्याकडे गुन्ह्याबाबत सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीच्या कब्जातून व आरोपीच्या राहत्या घरातून ९ लाख ४ हजार ८०० रुपये किमतीचे १०२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ४५ हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल, १ लाख ७० हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकल असा एकूण ११ लाख १९ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. पुढील तपास अहिल्यानगर तालुका पोलीस ठाणे करीत आहे.

### श्रीगोंदा, नगर तालुक्यातील गुन्हे उघडकीस

आरोपीकडे त्यांनी आणखी अशा प्रकारे गुन्हे केले आहेत काय याबाबत सखोल तपास करता आरोपींकडून अहिल्यानगर तालुक्यातील ३, नगर शहरातील एक, श्रीगोंदा शहरातील ४, सुपा व बेलवंडी हद्दतील प्रत्येकी एक असे दहा गुन्हे उघडकीस आले असून, अहिल्यानगर तालुका पोलीस ठाणे, श्रीगोंदा पोलीस ठाणे, सुपा पोलीस ठाणे, बेलवंडी पोलीस ठाणे, तोफखाना पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

### आरोपी रेकॉर्डवरील

गणेश दिवानजी काळे हा रेकॉर्डवरील आरोपी असून त्याच्याविरुध्द यापूर्वी अहिल्यानगर व बीड जिल्ह्यात ११ गुन्हे दाखल आहेत. यात भिंगार पोलीस ठाण्यात ४, पाथर्डी पोलीस ठाण्यात ३, अंमळनेर व तोफखाना पोलीस ठाण्यात प्रत्येकी १ असे एकूण ११ गुन्हे दाखल आहेत. आरोपी रोहित लल्या भोसले हा देखील रेकॉर्डवरील आरोपी असून त्याच्याविरुध्द पाथर्डी पोलीस ठाण्यात ३ गुन्हे दाखल आहेत.

## स्वस्तिक चौक परिसरातील अतिक्रमणांवर मनपाची कारवाई



नगर - शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणारे रस्ते मोकळे करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने ११ मे रोजी स्वस्तिक चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या रस्त्यावरील दोन्ही बाजूंची अनधिकृत अतिक्रमणे हटवली. या कारवाईमुळे रस्ते मोकळे झाले असून अतिक्रमणधारकांचे मोठे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे आणि अतिक्रमण विभाग प्रमुख तथा उपअभियंता सुरेश इथापे यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबवण्यात आली. प्रभाग समिती २ (शहर) अंतर्गत येणाऱ्या या भागात क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे आणि अतिक्रमण पथकाच्या ताफ्याने प्रत्यक्ष उपस्थित राहून कारवाईचा बडगा उगारला.

स्वस्तिक चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मुख्य रस्त्याच्या दुतर्फा असलेले अनधिकृत लक्झरी बस स्टॉल, पान टपऱ्या, चहाच्या टपऱ्या, खाद्यपदार्थांचे गाडे आणि अनधिकृत बोर्ड हटवण्यात आले. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या सभोवतालची चहाची दुकाने, शेड आणि लोखंडी काउंटर जप्त करण्यात आले आहेत. आतापर्यंत ४ ते ५ मोठे लक्झरी बस स्टॉल तोडून त्यांचे साहित्य ट्रकमध्ये भरून महापालिकेत जमा करण्यात आले आहे.

रस्त्यावरील वाहतुकीचे लक्ष विचलित करणाऱ्या लाईटच्या खांबावरील लहान बोर्डांसह अनधिकृत फ्लेक्सवरही कारवाई करण्यात आली. लोखंडी मोठे टेबल, साहित्य आणि काउंटर जप्त करून रस्ते चकाचक करण्यात आले आहेत. महापालिकेच्या या अचानक सुरू झालेल्या धडक कारवाईमुळे अतिक्रमणधारकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. आगामी काळातही शहरातील इतर मुख्य रस्त्यांवरील अनधिकृत अतिक्रमणे काढली जाणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## हेल्मेट सक्ती : पुन्हा सहा पोलिसांवर दंडात्मक कारवाई

नगर - जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना हेल्मेट वापरणे बंधनकारक केले आहे. तसेच जे कर्मचारी हेल्मेट वापरणार नाहीत, अशांवर थेट कारवाईचे आदेश दिले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार शहर वाहतूक शाखेच्या वतीने १२ मे रोजी पोलीस मुख्यालयात हेल्मेट न वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. वाहतूक शाखेकडून ६ जणांवर ही कारवाई करण्यात आली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी पोलीस दलासाठी हेल्मेट अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाली असून, पोलीस मुख्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात हेल्मेट न वापरणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. ८ व ९ मे रोजी पोलीस मुख्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय येथे वाहतूक शाखेने कारवाईची मोहिम राबविली. परंतु ९ मे सर्व पोलीस कर्मचारी हेल्मेट वापरु लागल्याचे दिसून आले. मात्र, १२ मे रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यत वाहतूक शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल सचिन पवार आणि गहिनाथ दहिफळे यांनी केली.

## एकाचवेळी ४ ठिकाणी जुगार अड्ड्यांवर पोलिसांची छापेमारी

### ६ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल केला जप्त, २० जणांना घेतले ताब्यात

नगर - पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार भिंगार कॅम्प पोलिसांनी तोफखाना व एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या बिंगो आणि हारजितीच्या जुगार अड्ड्यांवर १० मे रोजी सायंकाळी धडक कारवाई करत चार वेगवेगळ्या ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कारवाईत एकूण ६ लाख ३५ हजार ८५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून २० जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी एमआयडीसी आणि तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील विविध भागात बिंगो व जुगार सुरू असल्याची माहिती अधीक्षक सुदर्शन यांना मिळाल्यानंतर त्यांनी भिंगारचे सहाय्यक निरीक्षक जगदीश मुलगीर यांना कारवाईचे आदेश दिली. त्यानुसार उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे व योगेश पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने छापे टाकले. पहिली कारवाई आंबेडकर चौक, गांधीनगर-बोल्हेगाव येथे करण्यात आली. येथे पोलिसांनी दोघांना पकडले. १ लाख २१ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. दुसरी कारवाई शेंडी बायपास परिसरातील दूध डेअरी चौकाजवळ, हॉटेल मातोश्री शेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये करण्यात आली. येथे बिंगो जुगार सुरू असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी नऊ जणांना पकडले. त्यांच्याकडून २ लाख ३६ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शेंडी बायपास परिसरातील हॉटेल भाग्यश्री शेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या बिंगो जुगार अड्ड्यावरही पोलिसांनी कारवाई केली. या ठिकाणी पाच जणांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून १ लाख ४९ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नवनागापूर, दूध डेअरी चौक परिसरातही पोलिसांनी छापा टाकला. येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये बिंगो जुगार सुरू असल्याचे आढळून आले. या कारवाईत चार जणांना ताब्यात घेण्यात आले व १ लाख २८ हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत अंमलदार निसार शेख, रवींद्र टकले, दीपक शिंदे, नंदकुमार पठारे, प्रमोद लहारे, इस्त्राईल पठाण, रामनाथ डोळे, कैलास शिरसाठ आणि पोपट देव्हारे यांनी सहभाग घेतला.

## 'सिव्हील'च्या पार्किंग मधून मोटारसायकलची चोरी

नगर - सिव्हील हॉस्पिटलच्या पार्किंग मध्ये लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच १६ सी आर ९५१६)अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ९ मे रोजी दुपारी १.३० ते २.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत दीपक साहेबराव चितळकर (वय २६, रा. साकत, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## शामराव मिसाळ यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - शामरत्न विला, आदर्श कॉलनी, प्रोफेसर कॉलनी सावेडी येथील रहिवासी शामराव सखाराम मिसाळ (वय ८५) यांचे १२ मे रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १२ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. यशवंत व कौस्तुभ मिसाळ व सौ. गायत्री यांचे ते वडील होत.

## लिलाबाई पठारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - तोफखाना, परदेशी गल्ली येथील रहिवासी लिलाबाई बाजीराव पठारे (वय ८५) यांचे १२ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजू पठारे यांच्या त्या मातोश्री होत.

## कांतीलाल बोरा यांचे दु:खद निधन



बारामती - निरा, बारामती येथील रहिवासी कांतीलाल श्रीमल बोरा (निरावाला) (वय ८०) यांचे ९ मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निरा, बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. डॉ. दिलीप बोरा, नितीन बोरा, रवि बोरा, मनिषा गांधी यांचे ते वडील होत.

## सुषमा जाधव-अमर यांचे दु:खद निधन



नगर - अहिल्यानगर आकाशवाणीच्या माजी उद्घोषिता सुषमा प्रकाशजीत जाधव - अमर (वय ६१) यांचे ६ मे रोजी निधन झाले. जाधव यांनी अहिल्यानगर -पुणे आकाशवाणी केंद्रात उद्घोषिका म्हणून ३० वर्षे तसेच पत्रकार म्हणूनही काम केले. त्यांना आपटे पत्रकारिता पुरस्कार, ऊर्जिता फाऊंडेशनचा पुरस्कार प्राप्त झाला. दिवंगत कॉ.भास्करराव जाधव यांच्या कन्या, महापालिकेच्या निवृत्त प्रसिद्धी अधिकारी नीलिमा बंडलु यांच्या भगिनी होत. त्यांच्यामागे पती पत्रकार प्रकाशजीत अमर, मुलगी नताशा, जावई, नातू असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## नगर-सोलापूर महामार्गावर भीषण अपघातात दोघांचा मृत्यू, १ जखमी





नगर - नगर - सोलापूर महामार्गावर आंबिलवाडी (ता. नगर) शिवारात झालेल्या भीषण अपघातात जामखेड येथील अॅड. विराज भगवान जायभाय (वय २५, रा. शिक्षक कॉलनी, जामखेड) व ऋषिकेश उर्फ सोनू बाळासाहेब डुचे (वय २४, रा. तपनेश्वर गल्ली, जामखेड) या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड येथील ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. भगवान जायभाय यांचे पुत्र अॅड. विराज जायभाय हे पुणे येथील शिवाजीनगर न्यायालयात वकिली व्यवसाय करत होते. मोठ्या भावाच्या विवाहासाठी ते जामखेड येथे आले होते. विवाह सोहळा आटोपल्यानंतर ११ मे रोजी पहाटे च्या सुमारास विराज जायभाय, सोनू डुचे व पुणे येथील एक मित्र असे तिघेजण आय-२० कारमधून (क्र.एमएच १७ एझेड ३२४२) पुण्याकडे निघाले होते.

सोलापूर महामार्गाने ने अहिल्यानगरच्या दिशेने येत असताना आंबिलवाडी शिवारातील वळणावर चालकाचा अंदाज चुकल्याने भरधाव कार रस्ता सोडून अनेक पलट्या खात शेतात घुसली. अपघात इतका गंभीर होता की अॅड. विराज जायभाय व सोनू डुचे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्यासोबत असलेला पुणे येथील मित्र गंभीर जखमी झाला आहे.

अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. त्यांनी तातडीने गाडीत अडकलेल्या तरुणांना बाहेर काढून जामखेड येथे संपर्क साधत घटनेची माहिती दिली. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून जामखेड शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, अॅड. विराज जायभाय यांच्या निधनाबद्दल दुःखात सहभागी होत दोन दिवस न्यायालयीन कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती वकील संघाचे अॅड. अमीर खान यांनी दिली.

## दीड वर्षाच्या मुलासह विवाहितेची विहिरीत उडी घेवून आत्महत्या

### सासरच्या ५ जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल



साळू चौरे (मयत)



शिवांश चौरे (मयत)

जामखेड - जामखेड तालुक्यातील वंजारवाडी येथील विवाहितेने सासरी होणाऱ्या छळाला कंटाळून आपल्या दीड वर्षाच्या मुलासह तरडगाव शिवारात एका विहिरीमध्ये उडी घेवून आत्महत्या केल्याची घटना ११ मे रोजी सकाळी ११ च्या सुमारास उघडकीस आली आहे. साळू शिवाजी चौरे (वय २४) आणि तिचा दीड वर्षाचा मुलगा शिवांश शिवाजी चौरे अशी मृतांची नावे असून, तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी पती, सासू, सासरे, दिर व जाव अशा ५ जणांवर खर्डा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वंजारवाडी येथील बिभीषण तांदळे (वय ५९) यांनी खर्डा पोलीस स्टेशनला दिलेल्या माहितीनुसार, त्यांची पुतणी आणि नातू हे १० मे पासून बेपत्ता होते.शोध सुरू असतानाच, ११ मे रोजी सकाळी आकरा वाजेच्या सुमारास तरडगाव येथील दत्तोबा ढाळे यांच्या विहिरीत दोघांचेही मृतदेह तरंगताना आढळून आले. घटनेची माहिती मिळताच खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत व सहाय्यक फौजदार सय्यद यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह विहिरीबाहेर काढून जामखेड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

दरम्यान याबाबत मयत साळूचे वडील देविदास शंकर तांदळे (वय ६५, रा बांगरवस्ती, वंजारवाडी, ता. जामखेड) यांनी सायंकाळी खर्डा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून सासरच्या छळाला कंटाळून साळू हिने आत्महत्या केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी मयत साळू चा पती शिवाजी अंगद चौरे, सासरा अंगद दशरथ चौरे, सासू विजाबाई अंगद चौरे, दिर धनंजय अंगद चौरे, जाव कमल धनंजय चौरे यांच्या विरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी पती, सासरा व दिर या तिघांना अटक केली आहे.

## बसमध्ये महिलेशी अश्लिल कृत्य करणाऱ्या वाहकावर गुन्हा दाखल

### एसटी महामंडळ प्रशासनाकडून निलंबनाचीही कारवाई

नगर - एसटी महामंडळाच्या शिवाई ई बस मध्ये प्रवाशी महिलेसोबत कृत्य करणाऱ्या वाहकावर ११ मे रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नूर मोहम्मद सिराज पटेल (वय ४२, रा. मुकुंदनगर) असे त्या गुन्हा दाखल झालेल्या वाहकाचे नाव आहे. हा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगरमधून रॅली काढत कायनेटिक चौकात ११ मे रोजी दुपारी रास्तारोको करण्यात आला होता.

यासंदर्भात तारकपूर बस डेपोचे डेपो मॅनेजर अभिजीत चौधरी यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे, २५ एप्रिल २०२६ रोजी तारकपूर डेपोची ई-शिवाई बस ही अहिल्यानगर-नाशिक व नाशिक-अहिल्यानगर या मार्गावर धावत होती. या बसवर वाहक म्हणून पटेल याची नियुक्ती होती. प्रवासादरम्यान एका महिला प्रवाशाला उलटीचा त्रास होत असल्याने वाहकाने चालकाकडून प्लास्टिक पिशवी घेत ती संबंधित महिलेला दिली.

त्यानंतर महिला प्रवासी मागील सीटवर जाऊन बसली. काही वेळाने वाहक पटेल देखील तिच्या शेजारी जाऊन बसल्याचे आणि महिला प्रवासीसोबत संशयास्पद तसेच अश्लील हालचाली करत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. बसमधील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. या फुटेजमध्ये नूर पटेल हा संबंधित महिलेसोबत अश्लील कृत्य करताना दिसून आल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी वाहक नूर पटेल याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २९६, महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ११०, ११७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, सदरचा प्रकार समोर आल्यावर एसटी महामंडळ प्रशासनाकडून संबंधित वाहकाला विभागीय चौकशीनंतर निलंबित करण्यात आले आहे.

## पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलेचे दागिने पळविले

नगर - शहर परिसरात जबरी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच, ग्रामीण भागातही या घटना होवून लागल्या आहेत. नगर तालुक्यातील गुणवडी शिवारात रुईछत्तीसी रस्त्यावर एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने दुचाकीवर आलेल्या दोघांनी हिसकावून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पार्वती महादेव खेडके (वय ४९, रा. गुणवडी, ता. नगर) यांनी ११ मे रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या सायंकाळच्या सुमारास गुणवडी शिवारात रुईछत्तीसी ते गुणवडी रस्त्याने पायी जात असताना समोरून एका दुचाकीवर दोन अनोळखी तरुण आले. त्यांनी महिलेसमोर दुचाकी थांबवून 'हा रस्ता नगरला जातो का?' अशी विचारणा केली. महिलेला काही समजण्याच्या आतच, दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ४८ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत बळजबरीने ओढली आणि चोरून नेली. घटनेनंतर पीडित महिलेचे नातेवाईक पुण्यात असल्याने तक्रार देण्यास विलंब झाला. मात्र, आता या प्रकरणी दोन अनोळखी चोरट्यांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे करत असून, चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. नागरिकांनी अनोळखी व्यक्तींपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रस्ता ओलांडताना भरधाव वाहनाच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

नगर - शहरातील मनमाड रस्त्यावरील परिचय हॉटेल समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाच्या धडकेत एका वृध्दाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद विठ्ठल भिंगारदिवे (वय ६०, रा. खंडोबा मंदिराजवळ, सावेडी गाव) असे मयत वृध्दाचे नाव आहे.

याबाबत सिध्दांत शरद भिंगारदिवे (वय २५, रा. सावेडी) यांनी ११ मे रोजी फिर्याद दिली आहे. शरद भिंगारदिवे हे ६ मे २०२६ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पत्रकार चौकाकडून मनमाडकडे जाणाऱ्या रस्त्यावर, परीचय हॉटेलसमोर रस्ता ओलांडत असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या पांढऱ्या रंगाच्या वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या व्यक्तींनी त्यांना तत्काळ उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने वाहन थांबविले होते. मात्र जखमी व्यक्तीस कोणतीही मदत न करता तो घटनास्थळावरून निघून गेला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करत वाहनचालकाचा शोध सुरु केला आहे.

# चटपटीत आणि कुरकुरीत कॉर्न



दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता. चला तर, करु या.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.

झटपट रेसिपी

# कौशल्यामुळे बदलली दिशा

अचिव्हर

**टेक जगतातील यशाच्या कथा बाहेरून पाहायला अनेकदा सोप्या वाटतात; पण प्रत्यक्षात त्यामागे अनेक कठीण निर्णय आणि संघर्ष दडलेले असतात. इम्युनल जॉन यांची कहाणीही याच प्रकारची आहे. करिअरच्या अगदी सुरुवातीलाच घेतलेल्या निर्णयाने त्यांच्या आयुष्याची दिशा पूर्णपणे बदलून टाकली. त्यांना पहिली नोकरीची ऑफर मिळाली, तेव्हा त्यांचा पगार २५ हजार रुपये होता. साधारणपणे फ्रेशर्ससाठी ही एक चांगली संधी मानली जाते; पण इमॅन्युएल यांना या ऑफरमध्ये समाधान वाटले नाही. त्यांना जाणवले, की या नोकरीत शिकण्याच्या आणि पुढे जाण्याच्या संधी मर्यादित आहेत. त्यामुळे त्यांनी ही ऑफर नाकारण्याचा निर्णय घेतला. करिअरच्या सुरुवातीलाच स्थिर उत्पन्न नाकारणे हा धाडसी आणि जोखमीचा निर्णय होता; पण त्यांनी अल्पकालीन सोयीपेक्षा दीर्घकालीन प्रगतीला प्राधान्य दिले.**

पहिली नोकरी नाकारल्यानंतर त्यांनी हार मानली नाही. त्यांनी एका इंटर्नशिपची निवड केली, जिथे त्यांना फक्त दहा हजार रुपये स्टायपेंड मिळत होता. ही रक्कम कमी असली, तरी तिथे शिकण्याच्या संधी मोठ्या होत्या. या काळात त्यांनी खूप मेहनत घेतली, दीर्घ वेळ काम केले. नवीन कौशल्ये आत्मसात केली आणि स्वतःला सातत्याने अधिक सक्षम बनवले. हा काळ त्यांच्या करिअरचा पाया ठरला. सुरुवातीपासून प्रत्येक गोष्ट शिकण्याची त्यांची तयारी पुढे त्यांच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरली. या प्रवासात त्यांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. काही वेळा आर्थिक परिस्थिती इतकी कठीण झाली, की रोजचे खर्च भागवणेही अवघड झाले. त्यांनी स्वतःच्या गरजा खूप कमी केल्या आणि अनेकदा फक्त मॅगी खाऊन दिवस काढले. हे दिवस नक्कीच सोपे नव्हते; पण याच संघर्षांनी त्यांना अधिक मजबूत बनवले. त्यांनी कधीही हार मानली नाही आणि आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवले. त्यांची ही चिकाटी आणि मेहनतच पुढे त्यांच्या यशामागील मुख्य कारण ठरली.

काळाच्या ओघात त्यांच्या परिश्रमाचे फळ मिळू लागले. त्यांच्या कौशल्यांमध्ये वाढ होत गेली आणि त्यांना अधिक चांगल्या संधी मिळू लागल्या. त्यांच्या करिअरमधील एक मोठा टप्पा तेव्हा आला, जेव्हा त्यांना साडेतीन लाख रुपये प्रतिमहिना पगाराची नोकरी मिळाली. ही त्यांच्यासाठी मोठी संधी होती आणि त्यांनी घेतलेले निर्णय योग्य दिशेने होते याचा तो पुरावा होता; मात्र त्यांनी यालाच अंतिम यश मानले नाही. जिथे अनेकजण अशा पगारावर समाधानी होतात, तिथे इमॅन्युएल यांनी पुन्हा एक मोठा आणि धाडसी निर्णय घेतला. त्यांनी नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा मार्ग निवडला आणि 'टेकास टेक्नॉलॉजीस' ची स्थापना केली. स्वतःचा स्टार्टअप सुरू करणे हे सोपे नसते, कारण त्यामध्ये अनिश्चितता आणि जोखीम दोन्ही असतात; मात्र त्याचबरोबर स्वतःच्या कल्पनांवर काम करण्याचे स्वातंत्र्यही मिळते. 'टेकास टेक्नॉलॉजीस' च्या माध्यमातून त्यांनी नेहमी वास्तवातील समस्यांवर उपाय शोधण्यावर भर दिला. ट्रेंड्सच्या मागे धावण्याऐवजी लोकांना प्रत्यक्ष उपयोगी पडतील आणि दीर्घकाळ टिकतील असे टेक सोल्यूशन्स विकसित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.



कंपनीला पुढे नेणे, बाजारात स्वतःची ओळख निर्माण करणे आणि सतत बदलणाऱ्या टेक इंडस्ट्रीमध्ये टिकून राहणे हे सोपे नव्हते; पण त्यांच्या सुरुवातीच्या संघर्षांनी त्यांना इतके सक्षम बनवले होते, की ते प्रत्येक आव्हानाला ठामपणे सामोरे जाऊ शकले.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

टेक्नोटॉक

## मोबाईल गरम होतोय?



मोबाईल वारंवार गरम होणे ही सध्याच्या काळात एक मोठी समस्या बनली आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांत किंवा हेवी गेमिंग करताना हा त्रास जास्त जाणवतो. फोनचा प्रोसेसर प्रमाणाबाहेर काम करतो, तेव्हा अंतर्गत भागातून उष्णता बाहेर टाकली जाते. त्यामुळे फोन केवळ गरमच होत नाही, तर तो हँगदेखील होऊ लागतो. सततच्या उष्णतेमुळे बॅटरीच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो.

तुमचा फोन थंड ठेवण्यासाठीची पहिली प्रभावी ट्रिक म्हणजे 'बॅकग्राउंड रिफ्रेश' आणि नको असलेले ॲप्स त्वरित बंद करणे. अनेकदा आपण एखादे ॲप वापरून झाल्यानंतर ते तसेच सोडून देतो. ते बॅकग्राउंडला सुरू राहून प्रोसेसरवर ताण देतात. सेटिंगमध्ये जाऊन 'बॅकग्राउंड डेटा यूसेज' मर्यादित करा. याव्यतिरिक्त फोन चार्जिंगला लावलेला असताना कधीही जड कामे किंवा गेमिंग करू नका. चार्जिंगमुळे बॅटरी आधीच गरम होत असते आणि त्यात स्क्रीनचा वापर केल्यास उष्णता दुप्पट वाढून फोन हँग होऊ शकतो.

दुसरी महत्त्वाची ट्रिक म्हणजे फोनच्या सॉफ्टवेअरकडे लक्ष देणे. अनेकदा जुन्या ऑपरेटिंग सिस्टममध्ये काही बग्ज असतात. ते बॅटरी आणि प्रोसेसरचा जास्त वापर करतात. त्यामुळे फोन गरम होतो. त्यामुळे फोन नेहमी लेटेस्ट सॉफ्टवेअरवर अपडेट ठेवा. फोन अचानक जास्त तापला, तर त्याचा बॅक कव्हर किंवा केस काही वेळासाठी काढून ठेवा. जाड कव्हरमुळे उष्णता बाहेर पडण्यास अडथळा निर्माण होतो. कव्हर काढल्यामुळे फोनची उष्णता लवकर हवेत विरते आणि फोन नैसर्गिकरित्या गार होण्यास मदत मिळते. या दोन सोप्या ट्रिक्ससोबतच फोनला थेट सूर्यप्रकाशापासून वाचवणेदेखील तितकेच आवश्यक आहे. उन्हात प्रवास करताना किंवा गाडीच्या डॅशबोर्डवर फोन ठेवल्याने तो वेगाने तापू शकतो. फोन खूपच गरम झाला असेल, तर तो एअरप्लेन मोडवर टाका किंवा काही मिनिटांसाठी स्विच ऑफ करा. यामुळे सर्व रेडिओ लहरी आणि प्रोसेसिंग थांबते परिणामी फोन अवघ्या काही मिनिटांत पुन्हा नॉर्मल तापमानावर येतो.

या साध्या उपायांमुळे फोन केवळ कूल राहणार नाही, तर तो कधीच लॅग किंवा हँग होणार नाही.

ॲप वर्ल्ड

## व्हॉट्सॲपचे मजेदार फीचर



व्हॉट्सॲप लवकरच आपल्या अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी एक अतिशय सोपे आणि मजेदार फीचर आणणार आहे. यामुळे चॅटिंग करताना आता दुसरे ॲप बंद करण्याची गरज पडणार नाही. स्क्रीनवर छोटे छोटे 'बबल्स' दिसतील आणि त्यावर टॅप करून लगेच मेसेज पाठवू शकाल.

मेसेज येईल तेव्हा स्क्रीनवर एक छोटासा गोल बबल उभा राहील. त्यात पाठवणाऱ्याचा फोटो आणि व्हॉट्सॲपचा आयकॉन दिसेल. बबलवर एकदा टॅप केले, की छोटी चॅट विंडो उघडेल आणि त्वरित उत्तर लिहू शकाल. हे फीचर फेसबुक मेसेंजरच्या 'चॅट हेड्स'सारखेच आहे. बबल्स स्क्रीनवर कुठेही तरंगत राहतील आणि त्रास देत नाहीत. आता युट्युब पाहत असाल, गेम खेळत असाल किंवा इंटरनेट ब्राउझ करत असाल, तरीही चॅट चालू ठेवता येईल.

वारंवार व्हॉट्सॲप उघडण्याची आणि बंद करण्याची सवय संपेल. मल्टीटास्किंग करणाऱ्या विद्यार्थी, नोकरी करणाऱ्या लोकांसाठी हे फीचर खूप उपयुक्त ठरेल. बबल्समुळे चॅटिंगचा अनुभव खूपच वेगवान आणि सोयीस्कर होईल.

दुर्दैवाने हे फीचर फक्त अँड्रॉइड फोनमध्येच येणार आहे. आयओएस म्हणजे आयफोन वापरकर्त्यांना याचा लाभ मिळणार नाही, कारण आयओएसमध्ये अशा बबल्सना सपोर्ट नाही. हे फीचर अँड्रॉइड ११ किंवा त्यापेक्षा नवीन आवृत्ती असणाऱ्या फोनवर चांगले चालेल. जुन्या फोनमध्ये कदाचित काही अतिरिक्त परवानग्या द्याव्या लागतील.

सध्या हे फीचर विकासाच्या टप्प्यात आहे. लवकरच काही निवडक अँड्रॉइड बीटा वापरकर्त्यांना ते चाचणीसाठी उपलब्ध होईल. सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठी हळूहळू अपडेट येईल. हे बबल्स आवडत नसतील, तर ते पूर्णपणे बंद करण्याचा पर्यायही उपलब्ध असेल. हे नवे फीचर येण्याने व्हॉट्सॲपचा वापर आणखी मजेदार आणि सोपा होणार आहे. आता चॅटिंग करताना कुठलेही काम थांबवावे लागणार नाही. लवकरच अपडेट येत असल्याने सर्व अँड्रॉइड यूजर्सना ही बातमी आनंद देणारी ठरेल.

# हॉटेल आणि पर्यटन क्षेत्रात संधी



करियरवाटा

रॅडिसन हॉटेल ग्रुपने भारतात मोठा विस्तार करण्याच्या तयारीत असून २०३० पर्यंत देशभरात ५०० हॉटेल्स सुरू करण्याचं लक्ष्य कंपनीनं ठेवलं आहे. यामुळे देशात सुमारे ६५ हजार ते ८० हजार रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. विशेष म्हणजे, ही हॉटेल्स फक्त मोठ्या शहरांमध्येच नाही, तर छोट्या शहरांमध्ये आणि धार्मिक पर्यटनस्थळांवरही सुरू केली जाणार आहेत.

सध्या कंपनीची भारतात २०० हून अधिक हॉटेल्स आहेत. पुढील काही वर्षांत टियर-१, टियर-२, टियर-३ आणि टियर-४ शहरांमध्ये नवीन हॉटेल्स सुरू करण्यावर कंपनीचा भर असणार आहे. यामध्ये रिसॉर्ट्स आणि धार्मिक पर्यटनस्थळांवरील हॉटेल्सचाही समावेश असेल. छोट्या शहरांमध्ये तीन आणि चार स्टार श्रेणीतील हॉटेल्स अधिक फायदेशीर ठरतात. त्यामुळे सुमारे ४५ ते ५० टक्के हॉटेल्स अपस्केल म्हणजेच तीन किंवा चार स्टार प्रकारातील असतील, तर फक्त १५ टक्के हॉटेल्स फाइव्ह स्टार श्रेणीत असतील. रोजगार निर्मितीसाठी कंपनी स्किल डेव्हलपमेंटवरही भर देत आहे.

यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण, शैक्षणिक संस्थांशी भागीदारी आणि स्थानिक पातळीवर भरती यावर काम सुरू आहे. कंपनीचा उद्देश केवळ नोकऱ्या देणे नसून लोकांना दीर्घकालीन करिअरच्या संधी उपलब्ध करून देणे आहे. दरम्यान, पश्चिम आशियातील संघर्षाचा परिणाम सध्या भारतातील हॉटेल व्यवसायावर मोठ्या प्रमाणात दिसत नसल्याचे कंपनीने म्हटले आहे.

# वीकेंडसाठी मुनावळे

भटकंती

पुणे व सातारा परिसरातील पर्यटकांसाठी मुनावळे हे ठिकाण 'वीकेंड स्पॉट' म्हणून झपाट्याने लोकप्रिय होत असून, वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर येथे पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. कोयना धरणाच्या निळ्याशार पाण्यात बोटिंग, कायकिंग, तसेच स्कूबा डायव्हिंगसारख्या जलक्रीडांचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत.

निसर्गरम्य परिसर, शांत वातावरण आणि शहराच्या गजबजाटापासून दूर असलेले हे ठिकाण दोन दिवसांच्या सहलीसाठी पर्यटकांना आकर्षित करत आहे. विशेषतः मुंबई, पुण्यातील आयटी क्षेत्रातील तरुण, कुटुंबीय आणि मित्रमंडळी 'वीकेंड गेटवे' म्हणून मुनावळेला पसंती देताना दिसत



आहेत. कमी वेळेत पोहोचता येणे आणि तुलनेने परवडणारा खर्च हेही या ठिकाणाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरत आहे. मुनावळे येथे भारतातील गोड्या पाण्यातील स्कूबा डायव्हिंगचा अनुभव देण्याचा उपक्रम सुरू असून, पर्यटकांसाठी तो विशेष आकर्षण ठरत आहे. पाण्याखालील अनुभव, सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि प्रशिक्षित मार्गदर्शकांमुळे नवख्या पर्यटकांनाही हा अनुभव घेणे सुलभ झाले आहे. याशिवाय स्पीड बोट, पॅडल बोट यांसारख्या विविध जलक्रीडा पर्यायांमुळे पर्यटकांचा वेळ उत्साहात जात आहे. दरम्यान, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या माध्यमातून येथे मूलभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. पार्किंग, विश्रांती व्यवस्था, स्वच्छता आणि सुरक्षा यावर भर दिला जात असून, आगामी काळात हे ठिकाण अधिक विकसित पर्यटन केंद्र म्हणून पुढे येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांनाही या पर्यटनामुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून, बोटिंग व्यवसाय, खाद्यपदार्थ विक्री, तसेच निवास व्यवस्था यामधून उत्पन्नाचे मार्ग खुले होत आहेत. त्यामुळे मुनावळे हे केवळ पर्यटन केंद्र न राहता स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारे ठिकाण ठरत आहे. मुनावळे येथील जल पर्यटन केंद्रामुळे स्थानिक युवकांना या ठिकाणी रोजगार उपलब्ध झाला असून, बाहेरील पर्यटकांसाठी कृषी पर्यटन केंद्र, होम स्टे, टेन्ट निवास आदी सुविधा निर्माण होत असून, यामुळे रोजगाराच्या संधी वाढत आहेत.

# ट्रेकिंगसाठी तयार?

स्टे फिट

दोस्तांनो, ट्रेकला जायचं तर फिटनेस हवा. चलता है... हा ॲटिट्यूड अशावेळी उपयोगाचा नाही. फक्त जास्त उंचीवरच्या, कठीण ट्रेक्ससाठी तयारी करून भागत नाही. सोपे आणि साधे ट्रेक्स आणि ट्रेल्सही आपल्या फिटनेसची परीक्षा बघत असतात. त्यामुळे ट्रेक कोणताही असला तरी तंदुरूस्ती राखणं गरजेचं असतं. यासाठी अगदी साधे व्यायाम करता येतील.

* धावण्याला परिपूर्ण व्यायाम म्हटलं जातं. संपूर्ण शरीराला याचे लाभ होतात. हा कार्डिओ व्यायामप्रकार आहे. यामुळे तुमचं शरीर हायकिंगसाठी तयार होतं. स्नायू बळकट होतात. स्टॅमिना वाढतो.

* स्क्वॉट्समुळे पायांची क्षमता वाढते. ट्रेकिंग करायचं तर पाय बळकट हवे. ही बळकटी स्क्वॉट्समुळे मिळते. स्क्वॉट्सचे अनेक प्रकार आहेत. त्यांचं मिश्रण करून तुम्ही पायांना शक्ती देऊ शकता. स्क्वॉट्समुळे हृदय बळकट होतं. रक्तदाब नियंत्रणात रहातो आणि रक्तातल्या साखरेचं प्रमाणही वाढत नाही.



* स्नायूंना बळकटी मिळवून देण्यासाठी लंजेस करा. फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लंजेसच्या मिश्रणातून पायांचे स्नायू बळकट होतात. इतकंच नाही तर वेड्यावाकड्या वळणांवर शरीराचा समतोल साधणंही यामुळे शक्य होतं.

* लेग लिफ्ट्समुळे पायांचे स्नायू ताणले जातात. लवचिकता वाढते. या व्यायामामुळे चालताना किंवा चढण्यामुळे येणारा अतिरिक्त ताण झेलण्यासाठी पाय सक्षम होतात.

* नवख्या ट्रेकर्सनी जिने चढण्यापासून व्यायामाला सुरूवात करावी. हा अगदी साधा आणि कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. जिने चढल्याने जॉगिंगपेक्षाही जास्त कॅलरी खर्च होतात. हृदय, मज्जासंस्थेचं आरोग्य सुधारतं.

# पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना परदेशी संधी

रोजगारवाटा

राज्यातील विविध पॉलिटेक्निकची महाविद्यालयांतून पदविका घेतलेल्या आणि सध्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना जर्मनी, जपान व रशिया या देशांमध्ये थेट नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

याअंतर्गत पहिल्या टप्प्यात एक हजार, तर दुसऱ्या टप्प्यात चार हजार आणि तिसऱ्या टप्प्यात तब्बल १० हजारांहून अधिक उमेदवारांना परदेशातील नोकरीची संधी मिळणार आहे. यासाठी कौशल्य उत्कृष्टता केंद्रामार्फत जर्मनी जपान कुशल कामगार गतिशीलता उपक्रमासाठी अंमलबजावणी व उद्योग समन्वय भागीदार म्हणून कार्य करणार आहे. करारानुसार प्रशिक्षण, मार्गदर्शन व कौशल्य समन्वय साधला जाणार असून यासाठी राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे उपक्रमांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून त्यासाठी समन्वय साधला जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना जर्मनी, जपान आदी देशांमधील भाषा, तेथील लोकव्यवहार, भाषिक व्यवहार आदीचे ज्ञान देण्यासाठी एक ते सहा महिन्यांचे खास प्रशिक्षण दिले जाईल.



जर्मनी, जपानच्या व्यावसायिक मानकांशी सुसंगत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखड्याशी सुसंगत प्रमाणपत्रही बहाल केले जाणार आहे.

पहिल्या टप्प्यात पायलट प्रकल्प म्हणून जर्मनीतील मागणीनुसार ५०० ते एक हजार विद्यार्थ्यांना २-३ प्राधान्य क्षेत्रांमध्ये संधी दिली जाईल. दुसऱ्या टप्यात तीन ते चार हजार उमेदवार तयार केले जातील आणि चौथ्या टप्प्यात परदेशातील नोकऱ्यांसाठी दरवर्षी १० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष केंद्रित केले जाईल.

जर्मनी, जपान व रशिया या देशांमध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मोठी मागणी असून स्थानिक भाषेचे मूलभूत ज्ञान असल्यास रोजगाराच्या संधी लक्षणीयरीत्या वाढतात.

# पुरुषांच्या फॅशनमध्ये नवे ट्रेंड

फॅशन पॅशन

आजच्या काळात पुरुषांची फॅशन झपाट्याने बदलत आहे. स्किनी जीन्सचे पुनरागमन असो किंवा क्लासिक लोफर्सचे नवे रूप; आजची स्टाइल ही स्ट्रीटवेअर आणि फॉर्मल कपड्यांचे मिश्रण, वेगवेगळ्या फिट्सचा प्रयोग आणि रंगांचा मोकळेपणाने वापर यावर आधारित आहे.

*स्ट्रीटवेअर + ड्रेस शूज -नवा फ्युजन लुक

आजकाल स्ट्रीटवेअर आणि फॉर्मल कपड्यांचे मिश्रण मोठ्या प्रमाणावर दिसत आहे. ड्रेस शूजसोबत स्ट्रीटवेअर घालणे हा सध्या ट्रेंड आहे. ब्लेझर किंवा फॉर्मल जॅकेटसह कॅज्युअल कपडे मिक्स करून वेगळा लूक तयार करता येतो.

* रंगीत कपड्यांची एन्ट्री; पण 'अर्थी टोन्स'ही ट्रेंडमध्ये

२०२६ मध्ये पुरुष अधिक रंगीत कपडे वापरताना दिसत आहेत. हिरवा, पिवळा, नारिंगी असे रंग लोकप्रिय आहेत, तरीही ब्राऊन, ऑलिव्ह, वॉश्ड ब्लॅकसारखे 'अर्थी टोन्स'ही तितकेच ट्रेंडी आहेत.



फॅशन आता 'डोळ्यात भरण्यापेक्षा' 'कम्फर्ट आणि फील'वर आधारित होत आहे.

* लूज आणि बॅगी टी-शर्ट्सचा ट्रेंड

या उन्हाळ्यात बॅगी टी-शर्ट्स मोठ्या प्रमाणावर दिसणार आहेत. साधे प्लेन टी-शर्ट किंवा ग्राफिक प्रिंट दोन्ही चालतील; पण फिटिंग थोडी सैल ठेवा.

* स्किनी जीन्स पुन्हा ट्रेंडमध्ये

स्किनी जीन्स पुन्हा फॅशनमध्ये येत आहेत; मात्र जुना लूक कॉपी न करता, नवीन स्टाइलमध्ये प्रोपोर्शन आणि वेगळ्या टॉप्ससोबत स्टाइल करणे महत्त्वाचे आहे.

* बॅरल-लेग पँट्सचा वाढता ट्रेंड

स्किनी जीन्ससोबतच बॅरल-लेग पँट्सही ट्रेंडमध्ये आहेत. या पँट्स स्टायलिश आणि व्हर्सटाइल असून, कॅज्युअलपासून पार्टीपर्यंत वापरता येतात.

* बूट्स विसरू नका

२०२६ मध्ये चेल्सी बूट्सपेक्षा काऊबॉय, लेस-अप आणि कॉम्बॅट बूट्स जास्त लोकप्रिय आहेत, तरीही वैयक्तिक स्टाइलनुसार निवड करता येते.

* 'हूडीज'चे लेयरिंग करा

हूडी हा अजूनही वॉर्डरोबचा महत्त्वाचा भाग आहे. पुलओव्हरसोबत झिप-अप हूडी वापरून लेयरिंग केल्यास लूक अधिक डायनॅमिक दिसतो.

* चोर कोट्स पुन्हा चर्चेत

चोर कोट्स हे क्लासिक आणि बहुपयोगी जॅकेट्स आहेत. हे कॅज्युअल आणि फॉर्मल दोन्ही प्रकारे स्टाइल करता येतात.

* ॲक्सेसरीजला द्या महत्त्व

नेकलेस, चेन, रिंग्स आणि टाय यांसारख्या ॲक्सेसरीज पुन्हा ट्रेंडमध्ये आल्या आहेत. लूक पूर्ण करण्यासाठी ॲक्सेसरीज महत्त्वाची भूमिका बजावतात.

# १००० कोटींच्या कर्जाचा घाट म्हणजे नगर शहराला 'खाईत' ढकलण्याचा सत्ताधाऱ्यांचा धोकादायक डाव

**सत्तेत असूनही अनुदान आणता येत नाही म्हणून उद्योग, आज पे ॲण्ड पार्कची लूट, उद्या प्रत्येक श्वासावर कर लावतील : किरण काळे**



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेने अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत तब्बल ५३८ कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची तयारी सुरू केली आहे. पाणी योजनेसाठी त्यात ३७५ कोटींच्या कर्जाचा घाट घातला जात आहे. तब्बल १००० कोटींच्या कर्जाचा घाट म्हणजे शहराला कर्जाच्या खाईत ढकलण्याचा सत्ताधाऱ्यांचा धोकादायक डाव आहे. गल्ली ते दिल्ली सत्ता असून देखील त्यांना अनुदान आणता येत नाही. म्हणून शहराला कर्जबाजारी करण्याचा उद्योग सुरू आहे. मनपाकडे साधे पगाराचे, विज बिल भरण्याचे पैसे नाहीत. आज पे ॲण्ड पार्कची लूट सुरू आहे. उद्या तर हे नगरकरांच्या प्रत्येक श्वासावर कर लावतील, अशी घणाघाती टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगरप्रमुख किरण काळे यांनी केली आहे. मनपाच्या कर्ज घेण्याच्या योजनेला ठाकरे शिवसेनेने विरोध केला आहे. १००० कोटींच्या कर्जातून टेंडरच्या माध्यमातून ठेकेदार, सत्ताधारी, राजकीय पदाधिकारी श्रीमंत होतील. पण शहर कायमचे रसातळाला जाईल, अशी भीती काळे यांनी व्यक्त केली आहे.

याबाबत बोलताना काळे म्हणाले, पाणी व भुयारी गटर योजनेच्या नावाखाली महापालिकेवर प्रचंड आर्थिक बोजा टाकण्याचा प्रकार सुरू असून महापालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता हे नियोजन पूर्णपणे आत्मघातकी आहे. आज वीज बिल, कर्मचारी पगारासाठी आर्थिक खळखळाट सुरू आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टी वसुली कोलमडलेली आहे. निधी अभावी रस्त्यांची कामं रखडली आहेत. अशा परिस्थितीत जागतिक बँक व अन्य वित्तीय संस्थांकडून सुमारे १००० कोटी रुपयांचे कर्ज घेणे म्हणजे शहराच्या भवितव्याशी खेळ करण्या सारखे असल्याचा आरोप काळेंनी केला आहे.

### आधी योजनांचे प्राधान्यक्रम ठरवा

पिण्याच्या पाण्यासाठी सावेडी, फेज टू, अमृत योजनेवर यापूर्वी कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे उपसा करण्याची क्षमता वाढली आहे. सुमारे पाच लाख लोकसंख्येसाठी पाणी वितरण करून देखील यातून पाणी उरेल एवढी क्षमता आहे. मात्र प्रत्यक्षात नगरकरांना आजही दिवसा आड, तर काही भागांत तीन-चार दिवसांनी, तेही कमी दाबाने पाणी वितरित केले जाते. काही भागात तर आजही टँकर सुरू आहेत. असं असताना ४९५ कोटींची नवी पाणी योजना करणे म्हणजे जुन्या योजनांच्या अंमलबजावणीतील अपयश झाकण्या साठीचा हा घाट असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. आजही सावेडी, बोल्हेगावसह अनेक भागांमध्ये भुयारी गटारी योजना राबविणे बाकी आहे. या कामासाठी प्राधान्य द्यावे, असे काळे यांनी म्हटले आहे. मात्र त्यासाठी कर्ज नव्हे तर आपले राजकीय वजन वापरून शंभर टक्के अनुदान सत्ताधाऱ्यांनी आणून दाखवावे, असे आव्हान काळे यांनी दिले आहे.

### देवाभाऊ, तुमच्या आश्वासनाचे काय?

मनपा निवडणूक प्रचार सभे वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहर पाणी योजनेसाठी राज्य सरकारच्या वतीने नगरोत्थान योजनेतून सुमारे ४९५ कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र देवा भाऊंच्या घोषणेतील एक छदामही शहराला मिळालेला नाही. आश्वासनांना भुलून नगरकरांनी सत्ताधाऱ्यांना मनपात एका हाती सत्ता दिली. सत्ताधाऱ्यांकडे पाशवी बहुमत आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत एकहाती सत्ता आहे. मग राज्य आणि केंद्र सरकारकडून अनुदान आणण्याऐवजी जनतेच्या माथी कर्जाचा डोंगर का लादला जात आहे? असा सवालही काळे यांनी उपस्थित केला आहे.

### ठेकेदारांच्या टोळ्या नागरिकांचे जगणे असह्य करतील

सध्या शहरात पे ॲण्ड पार्कच्या नावाखाली सुरू असलेली अक्षरशः लूट नागरिक अनुभवत आहेत. व्यापारांसह सामान्य नगरकरांचा देखील याला कडाडून विरोध आहे. उद्या शेकडो कोटींचे कर्ज फेडण्यासाठी याच पद्धतीने मनपाच्या नावाखाली वेगवेगळे कर, शुल्क, दंड आणि वसुली लादून राजकीय गुंड आणि ठेकेदारांच्या टोळ्या नागरिकांचे जगणे असह्य करतील, असा इशारा किरण काळे यांनी दिला. विकासाच्या नावाखाली सुरू असलेले हे आर्थिक षडयंत्र शहराची आर्थिक घडी कायमची कोलमडून टाकू शकते, असे ते म्हणाले.

### वेळप्रसंगी जन आंदोलन छेडण्याचा ठाकरे शिवसेनेचा इशारा

ठाकरे शिवसेनेचा या नियोजनशून्य, शहर विरोधी आणि आत्मघातकी निर्णयाला तीव्र विरोध राहील. शहराला आर्थिक विनाशाकडे नेणाऱ्या या कारभारा विरोधात वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून ठाकरे शिवसेना तीव्र जनआंदोलन छेडले, असा इशारा किरण काळे यांनी दिला



नवीन पाणीपुरवठा आणि भुयारी गटर टप्पा २ योजनेसाठी निधी उभारणीच्या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी अहिल्यानगर महानगरपालिकेत येऊन प्रकल्पांची सविस्तर माहिती घेतली.

# पाणी व भुयारी गटार योजनांसाठी जागतिक बँकेकडून कर्जाचा प्रस्ताव

**राज्य शासनाच्या निर्देशानुसार कर्जाच्या माध्यमातून स्वहिस्सा उभा करणार : आयुक्त यशवंत डांगे**

नगर – शहरासाठी प्रस्तावित असलेल्या नवीन पाणीपुरवठा आणि भुयारी गटर टप्पा २ योजनेसाठी निधी उभारणीचे महानगरपालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार या दोन्ही योजनांसाठी सुमारे ७५ टक्के स्वहिस्स्याची रक्कम कर्जाच्या स्वरूपात उभी करण्याचे प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी सोमवारी अहिल्यानगर महानगरपालिकेत येऊन प्रकल्पांची सविस्तर माहिती घेतली. दोन्हीपैकी एका योजनेला जागतिक बँकेच्या मार्फत अर्थसहाय्य उपलब्ध होणार असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

जागतिक बँकेचे प्रतिनिधी ऍनी श्रेष्ठ, मूर्ती जन्नलागड्डा आणि सृष्टी ठाकूर यांनी सोमवारी महानगरपालिकेला भेट दिली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत प्रतिनिधींनी सध्या सुरू असलेल्या व नव्याने प्रस्तावित योजनांची प्रत्यक्ष माहिती घेतली. महानगरपालिकेला या दोन्ही मोठ्या प्रकल्पांसाठी लागणाऱ्या निधीपैकी ७५ टक्के रक्कम कर्जातून तर उर्वरित रक्कम राज्य शासनाच्या योजनांमधून उभी करायची आहे. यापैकी एका योजनेसाठी जागतिक बँकेकडून कर्ज उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, शासनाच्या योजनेतून प्रकल्प राबवायचा असल्यास महापालिकेला स्वहिस्सा भरावा लागतो. ४९५ कोटींच्या पाणी योजनेसाठी व ६०० कोटींच्या भुयारी गटर योजनेसाठी स्वहिस्सा उभारणे मनपाला स्वनिधीतून शक्य नाही. राज्य शासनाने जागतिक बँकेच्या साहाय्याने 'महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजना' (MUWREP) राबविण्यास मंजुरी दिली आहे. ही योजना नगर विकास विभागामार्फत राबवली जाणार आहे. या योजनेतून 'महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी' (MUINFRA) द्वारे जागतिक बँकेच्या सहाय्याने निधी उभारणीसाठी महानगरपालिकेने हे कर्जाचे प्रस्ताव केले आहेत. या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी महानगरपालिकेत येऊन योजनांची माहिती घेतली आहे. किमान एका योजनेला कर्जाच्या माध्यमातून निधी उपलब्ध होईल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला आहे.

# स्नेहालय बालभवनचा दहावीचा ७३.४७ टक्के निकाल

नगर – गरिबी, असुविधा आणि सामाजिक संघर्षांच्या छायेत वाढणाऱ्या विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि शिक्षणाच्या बळावर यशाचे शिखर गाठत समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. स्नेहालय संचलित बालभवन प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ७३.४७ टक्के निकालाची नोंद केली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत बालभवनमधील ४९ विद्यार्थ्यांपैकी ३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रतिकूल परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि मर्यादित साधनसंपत्ती यांवर मात करत विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश विशेष ठरत आहे. यामध्ये कलाम बालभवनची विद्यार्थिनी हर्षदा गणेश घोरपडे हिने ७८.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. क्षितीज बालभवनची रिया किरण साळवे हिने ७४.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर कलाम बालभवनची श्रुती विलास चखाले हिने ७०.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विशेष बाब म्हणजे, या विद्यार्थ्यांनी कोणत्याही खासगी शिकवणीशिवाय केवळ शाळेतील शिक्षण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यामुळे या निकालाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानद संचालिका वैशाली चोपडा, संचालक हनीफ शेख, प्रकल्प व्यवस्थापिका उषा खोल्लम, एडमिनिस्ट्रेटर राजू पांढरे, शिक्षक समन्वयक प्रतीक्षा साळवे, उमेद प्रकल्प समन्वयक यास्मिन शेख, समुपदेशिका रुबिना शेख, नदिम मोहम्मद सय्यद तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मातोश्री उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल ९१ टक्के



पठाण शिफा शेख आमेना शेख जिया

नगर – अलफलाह एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित मातोश्री उर्दू हायस्कूल, आलमगीर, नागरदेवळे, अहिल्यानगर या विद्यालयाने दहावीच्या निकालातील यश कायम ठेवत मार्च-२०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत मोठे यश संपादन मिळविले आहे.

मातोश्री उर्दू हायस्कूला दहावीचा निकाल ९१ टक्के लागला असून, मार्च-२०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये ५६ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. यापैकी पठाण शिफा शाहीद हिने ८३.०० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर, शेख आमेना अशफाक हिने ८०.६० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आणि शेख जिया जावेद हिने ७७.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

यशस्वी सर्व विद्यार्थिनींचे संस्थेचे प्रमुख कार्यवाह हाजी शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज, मुख्याध्यापक शेख जमीरअहमद इस्माईल तसेच शिक्षक शेख एजाजअहमद अब्दुल कुद्दूस, शेख महेनाज अब्दुस सलाम, खान सफिया सलीम, शेख अंजुम सत्तार आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांच्यासह ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# जुन्या वादातून मायलेकाला लोखंडी रॉड व काठीने मारहाण

नगर – जुन्या वादातून दोन गटात झालेल्या भांडणात मायलेकावर लोखंडी गजाने आणि लाकडी दांडक्याने हल्ला करत जखमी केल्याची घटना धनगरवाडी (ता.नगर) येथे घडली आहे. या मारहाणीत फिर्यादी महिलेचा हात मोडला असून त्यांच्या मुलालाही गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत सुभद्रा तुळशीराम शिकारे (वय ५०, रा. धनगरवाडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ९ मे रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास त्यांच्या घरासमोर असताना आरोपी पाराजी गोदुराम नाचण आणि कविता पाराजी नाचण यांनी वाद उकरून काढला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी लोखंडी गज तसेच लाकडी दांडक्याने फिर्यादी व त्यांच्या मुलाला बेदम मारहाण केली. या हल्लयात फिर्यादींचा डावा हात निकामी झाला असून आरोपींनी शिवीगाळ करत 'तुम्हाला जिवंत सोडणार नाही' अशी जीवे मारण्याची धमकीही दिली. जखमींना उपचारासाठी तातडीने शहरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी याप्रकरणी दोघांच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. शेख या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## सोनेवाडीच्या ज्ञानदीप विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

नगर – ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय, सोनेवाडी (ता.नगर) या विद्यालयाने एस.एस.सी. मार्च २०२६ परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील सर्व २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. यामध्ये स्नेहा दत्तात्रय दळवी हिने ८८.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच प्रणाली रावसाहेब लष्करे (८५.२० टक्के), संस्कृती भारत सुम्बे (८५ टक्के), श्रावणी अर्जुन वारे (८३ टक्के), दिशा भाऊसाहेब फोपसे (७८.०० टक्के) आणि तेजस्विनी बोरगे (७५.२० टक्के) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयाच्या श्रेणीवार निकालामध्ये विशेष गुणवत्तेत ६ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ७ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ८ विद्यार्थी तर पास श्रेणीत १ विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव अनिल जगन्नाथ दळवी (पाटील), शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ देवराम येणारे, सोनेवाडीचे सरपंच विठ्ठल दळवी, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन अरुण दळवी तसेच माजी सरपंच दिलीप सुंबे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन केले.

## वर्का स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजचा १०० टक्के निकाल



युवराज अतुल आढाव ईच्छा वैभव चव्हाण यासरअली मुशीर शेख

नगर – अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला.

यावेळी युवराज अतुल आढाव हा विद्यार्थी ९१ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. ईच्छा वैभव चव्हाण ही विद्यार्थिनी ८७.२० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आणि कुमार यासरअली मुशीर शेख हा विद्यार्थी ७८.२० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तसेच वर्का स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला.

यशाबद्दल अध्यक्षा श्रीमती रुहिया, मुख्याध्यापक डॉ. रामीन हुसेन, उपमुख्याध्यापिका शबनम खान यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# २ वर्षांचा प्रश्न एका दिवसात सुटला; योग्य मार्गदर्शन किती महत्त्वाचे...

आजच्या डिजिटल युगात आधार कार्ड हे प्रत्येक नागरिकासाठी अत्यंत महत्त्वाचे दस्तऐवज बनले आहे. शिक्षण, शिष्यवृत्ती, बँक व्यवहार, शासकीय योजना, प्रवेश प्रक्रिया अशा अनेक ठिकाणी आधार कार्डवरील माहिती अचूक असणे आवश्यक झाले आहे. मात्र, अनेक वेळा नाव किंवा जन्मतारीख दुरुस्तीची मर्यादा पूर्ण झाल्यानंतर सामान्य नागरिक पूर्णपणे हतबल होतो.

माझ्या मुलाच्या आधार कार्डावरील नावामध्ये दुरुस्ती करण्याची गरज होती. शैक्षणिक कागदपत्रांवरील नाव आणि आधार कार्डवरील नाव वेगळे असल्यामुळे APAAR ID तयार करण्यात अडचणी निर्माण होत होत्या. माझा मुलगा केंद्रीय विद्यालय क्र.१, अहिल्यानगर येथे इयत्ता १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेसाठी आधारमधील माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे.

मात्र, आधार केंद्रावर गेल्यानंतर दोन वेळा दुरुस्ती झालेली असल्याने आता दुरुस्ती होणार नाही, त्यासाठी मुंबईला जावे लागेल, असे स्पष्ट सांगण्यात आले. मागील जवळपास दोन वर्षांपासून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते, पण कोणताही मार्ग सापडत नव्हता. सामान्य नागरिकाप्रमाणे आम्हीही निराश झालो होतो. अशा वेळी योग्य मार्गदर्शन मिळाले ते ChatgptMo. आवश्यक कागदपत्रांसह मुंबई येथील UIDAI प्रादेशिक कार्यालयाला ईमेलद्वारे विनंती पाठविण्याचा सल्ला मिळाला. आश्चर्य म्हणजे – ज्या कामासाठी दोन वर्षे प्रयत्न सुरू होते, त्या कामाची दखल तत्काळ घेण्यात आली आणि एका दिवसात आधार दुरुस्ती पूर्ण होऊन सुधारित आधार कार्ड प्राप्त झाले!

हा अनुभव आमच्यासाठी अत्यंत आनंददायी आणि अविश्वसनीय होता. माझा आणि माझ्या परिवाराचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. योग्य माहिती, योग्य कागदपत्रे आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास प्रशासन किती सकारात्मक आणि संवेदनशील पद्धतीने काम करू शकते, याचा हा उत्तम अनुभव आहे.

यासाठी मी मनःपूर्वक त्या सर्वांचे आभार मानू इच्छितो ज्यांनी मला योग्य दिशा दाखवली. विशेषतः मुंबई येथील UIDAI प्रादेशिक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दाखवलेली तत्परता आणि सहकार्य खरोखरच कौतुकास्पद आहे.

आजही अनेक नागरिक अशाच समस्येमुळे त्रस्त आहेत. मुंबईला जावे लागेल या भीतीमुळे अनेकजण प्रयत्नच सोडून देतात. परंतु योग्य पद्धतीने ईमेलद्वारे विनंती, आवश्यक पुरावे आणि संयम ठेवला तर अनेक प्रश्न सुटू शकतात. त्यामुळे नागरिकांनी निराश न होता अधिकृत मार्गाचा अवलंब करावा.

हा माझा अनुभव इतरांसाठी मार्गदर्शक ठरेल, हीच अपेक्षा.

**– शेख शहाजान फकीर**
**अहिल्यानगर, मो.८३२९६१७३४३**

# 'डायल ११२' वर खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल; गुन्हा दाखल

नगर –शासकीय यंत्रणेचा विनाकारण वापर करून पोलिसांची दिशाभूल करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. कोठला परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीने आपल्या वहिनीने मारहाण केल्याची खोटी माहिती 'डायल ११२' या मदत क्रमांकावर दिली. मात्र, तपासात अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे समोर आल्याने तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र तुकाराम घुंगासे हे १० मे रोजी रात्रीच्या वेळी 'डायल ११२' च्या कर्तव्यावर होते. यादरम्यान मध्यरात्री पावणे एक वाजेच्या सुमारास आरोपी अमीर सलीम शेख (वय ३४, रा. कोठला, अहिल्यानगर) याने पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. आपल्या वहिनीने आपल्याला मारहाण केली असून तातडीने मदतीची गरज असल्याचे त्याने सांगितले. माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले.

प्रत्यक्षात त्या ठिकाणी चौकशी केली असता, मारहाणीची कोणतीही घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले. केवळ पोलिसांना त्रास देण्याच्या उद्देशाने ही खोटी तक्रार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात व्यत्यय आणून खोटी माहिती दिल्याप्रकरणी रवींद्र घुंगासे यांच्या फिर्यादीवरून अमीर शेख याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पुढील तपास करत आहेत. नागरिकांनी आपत्कालीन क्रमांकाचा गैरवापर करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## घरासमोरून हिरो होंडा मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – घरासमोर लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच १६ सी एल ७२६५)अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसरातील प्रशांत सोसायटी येथे घडली आहे. याबाबत नारायण दत्तात्रय सूरम (वय ७०, रा. प्रशांत सोसायटी, कल्याण रोड) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून कोतवाली पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# भारतीय शेअर बाजारात पुन्हा मोठी घसरण, सेन्सेक्स १००० अंकांनी कोसळला

मुंबई – भारतीय शेअर बाजारात १२ मे रोजी पुन्हा एकदा मोठी घसरण झाली आहे. मुंबई शेअर बाजार १००० अंकांनी घसरून ७४,९९२ वर आला तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी निर्देशांक २९० अंक घसरणीसह २३५०० च्या आसपास ट्रेड करत आहे. या दरम्यान, आयटी कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली.

१२ मे रोजी आयटी क्षेत्रात अचानक आणि तीव्र घसरण झाली, ज्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर घबराट पसरली. इन्फोसिस, टीसीएस आणि एचसीएल टेकपासून ते मिड-कॅप आयटी कंपन्यांपर्यंत जवळपास प्रत्येक प्रमुख आयटी कंपनीचे शेअर्स २ टक्के ते ४ टक्के घसरले होते.

या घसरणीमागे बाजारातील भावना बदलणाऱ्या एक मोठी हालचाल करणीभूत मानली जात आहे. ChatGPT बनवणाऱ्या अमेरिकेतील दिग्गज आयटी कंपन्यांपैकी OpenAI ने OpenAI Deployment Company या नवीन कंपनीच्या स्थापनेची घोषणा केली. मोठ्या संस्था आणि कंपन्यांना दैनंदिन कामकाजात विश्वासार्हपणे वापरता येईल अशी AI प्रणाली विकसित आणि कार्यान्वित करण्यास मदत करण्याचा या नव्या कंपनीचा उद्देश असेल. केवळ शक्तिशाली एआय मॉडेल्स तयार करणे पुरेसे नाही तर, कंपन्यांना सुरक्षितपणे आणि प्रभावीपणे वापरण्यास मदत करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे ओपनएआयचे मत आहे.

### एआयमध्ये ओपनआयची अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक

ओपनएआय डिप्लॉयमेंट कंपनी सुरू करण्यासाठी ४ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त प्रारंभिक निधी उभारला असून भागीदारीमध्ये टीपीजी, बेन कॅपिटल, गोल्डमन सॅक्स, सॉफ्टबँक आणि मॅकिन्से यांसारख्या प्रमुख गुंतवणूक आणि सल्लागार कंपन्यांचा समावेश आहे. जशिपख ने म्हटले आहे की, या उपक्रमाचा उद्देश एआयचा जागतिक स्वीकार गतीमान करणे आणि अशी तंत्रज्ञानं विकसित करणे आहे, ज्यामुळे भविष्यात मानवजातीला आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स (AGI) चा लाभ घेता येईल.

OpenAI च्या या नवीन घोषणेचा भारतीय बाजारातील आयटी क्षेत्रावरही परिणाम झाला आणि AI च्या झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे पारंपरिक आयटी सेवा कंपन्यांच्या व्यवसाय मॉडेलवर दबाव येण्याची गुंतवणूकदारांना भीती वाटू लागली. परिणामी, आयटी निर्देशांक सुमारे ३.२४ टक्के घसरला.

### आयटी स्टॉक्समध्ये घसरणीचे वर्चस्व

बाजारातील या घसरणीत आयटी स्टॉक्स महत्त्वाची भूमिका बजावताना दिसत आहेत. इन्फोसिसचे शेअर्स जवळपास ३.६% घसरून सुमारे १,१३५ रुपयांवर खाली आले, जी २०२० नंतरची नीचांकी पातळी आहे. त्याचवेळी, टाटांची दिग्गज आयटी कंपनी, टीसीएस, चे शेअर्स देखील ३.५ टक्के घसरणीसह ऑगस्ट २०२० नंतर २,३१० वर आले.

तसेच एचसीएल टेकचे शेअर्स देखील २ टक्के पेक्षा जास्त घसरून सप्टेंबर २०२३ नंतर १,१६८ रुपयांच्या नीचांकी पातळीवर व्यवहार करत होते. त्याचवेळी कोफोर्ज, पर्सिस्टंट सिस्टीम्स, म्फासिस आणि एलटीआयमाइंडट्री सारखे शेअर्स देखील ३ ते ४ टक्के घसरले, तर टेक महिंद्रा आणि विप्रोचे शेअर्सही २ ते ३ टक्के घसरणीसह ट्रेड करत आहेत.

### गुंतवणूकदारांना चार दिवसांत १३ लाख कोटींचा फटका

संमिश्र जागतिक संकेतांच्या पार्श्वभूमीवर १२ मे रोजी सेन्सेक्स आणि निफ्टी५० निर्देशांकांमध्ये सलग चौथ्या सत्रात घसरण दिसून आली. सलग चार सत्रांमध्ये सेन्सेक्स ३००० हून अधिक अंकांनी कोसळला, तर निफ्टी५० मध्ये ३ टक्के हून अधिक घसरण झाली आहे. त्याचवेळी, या घसरणीमुळे कालावधीत गुंतवणूकदारांचे सुमारे १३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आणि इडए वर नोंदणीकृत कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल बुधवार, ६ मे रोजीच्या ४७३ लाख कोटी रुपयांवरून १२ मे च्या व्यवहारादरम्यान ४६० लाख कोटी रुपयांपर्यंत कमी झाले.

